श्रीशांकर स्तोत्ररसावली

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

५६) श्री अन्नपूर्णाष्टकम् १

नित्यानन्दकरी वराभयकरी सौन्दर्यरत्नाकरी
निर्धूताखिलघोरपावनकरी प्रत्यक्षमाहेश्वरी ।
प्रालेयाचलवंशपावनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ।।१।।

आई जगदंबेचे अत्यंत दिव्य स्वरूप म्हणजे श्री अन्नपूर्णा. भगवान महाकाल विश्वनाथ आपल्या क्षुधाशांतीसाठी आई जगदंबे च्या समोर भिक्षेकरी रूपात उभे राहतात. ती काशीपूर निवासिनी त्यांना भिक्षा देते. भगवान जगद्गुरु आदी शंकराचार्य महाराज या स्तोत्रात त्या अन्नपूर्णेचे स्तवन करीत आहेत.

नित्यानन्दकरी - आई अन्नपूर्णेच्या कृपेने माणसाच्या जीवनात नित्य आनंद निर्माण होत असतो. क्षुधापूर्ती हा रोजच्या जीवनातील सगळ्यात मोठा आनंद. आई तो रोज प्रदान करते. वराभयकरी - भक्तांना वर आणि अभय प्रदान करणारी अशी ती आहे. सौन्दर्यरत्नाकरी- रत्नाकर म्हणजे समुद्र. सागरात अनेक रत्न सापडतात. अपार सौंदर्याचा जणु सागर असणाऱ्या आई जगदंबे ला सौन्दर्यरत्नाकरी असे म्हणतात.

निर्धूताखिलघोरपावनकरी- अखिल म्हणजे सर्व प्रकारचे तर घोर म्हणजे पाप, अपकृत्य. त्यांना निर्धूत म्हणजे पूर्णपणे धुवून टाकणे. अशा यांच्या सर्व पापांना, दुःखांना धुवून टाकून, पूर्णपणे काढून टाकून, जी त्यांना परमपावन करते ती निर्धूताखिलघोरपावनकरी.

प्रत्यक्ष माहेश्वरी- साक्षात त्रैलोक्य स्वामिनी असणारी.

प्रालेयाचलवंशपावनकरी- प्रालेयाचल म्हणजे हिमालय. त्याच्या घरी अवतार धारण केल्यामुळे जिने त्याचा वंश पवित्र केला आहे अशी.

काशीपुराधीश्वरी- काशी नगरीची सम्राज्ञी.

भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी- सकल कृपेचा आधार असणाऱ्या हे आई अन्नपूर्णे मला भक्ती, ज्ञान आणि वैराग्याची भिक्षा प्रदान कर.

श्रीशांकर स्तोत्ररसावली

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

५७) श्री अन्नपूर्णाष्टकम् २

नानारत्नविचित्रभूषणकरी हेमाम्बराडम्बरी
मुक्ताहारविलम्बमानविलसद्वक्षोजकुम्भान्तरी ।
काश्मीरागरुवासिताङ्गरुचिरे काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ।।२।।

नानारत्नविचित्रभूषणकरी- संस्कृतचे जे शब्द मराठीत वेगळ्याच अर्थाने वापरले जातात त्यातील एक शब्द म्हणजे विचित्र. मराठीत तो अजब , विक्षिप्त या अर्थाने वापरतात. मात्र संस्कृतमध्ये चित्र म्हणजे विविध रंगांनी आकर्षक. तर त्याला लावलेल्या विशेष या अर्थाच्या उपसर्गाने विचित्र म्हणजे विशेष आकर्षक. अत्यंत सुंदर.

आई अन्नपूर्णा अशा अनेक अत्यंत सुंदर रत्नांनी बनविलेली आभूषणे धारण करते म्हणून तिला नानारत्नविचित्रभूषणकरी असे म्हटले आहे.

हेमाम्बराडम्बरी- हेम म्हणजे सोने. अंबर म्हणजे वस्त्र. आडंबरी म्हणजे झाकलेली. सोनेरी जरकाम केलेले वस्त्र धारण केलेली.

मुक्ताहारविलम्बमानविलसद्वक्षोजकुम्भान्तरी- आई अन्नपूर्णेच्या विश्वक्षुधाशांतीकारक स्तनकुंभांच्या वर तथा मध्यभागात, मुक्ताहार अर्थात मोत्याच्या माळा रुळत असतात.

काश्मीरागरुवासिताङ्गरुचिरे- काश्मीरागरु म्हणजे काश्मीर प्रांतात सापडणारे आगरू नावाचे काळ्या रंगाचे विशेष चंदन. त्यासोबत काश्मिरातील केशर आणि हिमालयाच्या पायथ्याशी मिळणारी कस्तुरी. यांच्या उटीच्या सुवासाने अंग आकर्षक असणारी.

काशीपुराधीश्वरी- काशीनगरीची सम्राज्ञी.

भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी - हे सकल कृपेचा आधार असणाऱ्या माते अन्नपूर्णे ! मला भक्ती ज्ञान आणि वैराग्याची भिक्षा दे.

श्रीशांकर स्तोत्ररसावली

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

५८) श्री अन्नपूर्णाष्टकम् ३

योगानन्दकरी रिपुक्षयकरी धर्मैकनिष्ठाकरी
चन्द्रार्कानलभासमानलहरी त्रैलोक्यरक्षाकरी ।
सर्वैश्वर्यकरी तप:फलकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ।।३।।

आई अन्नपूर्णेच्या कृपेने साधकाला कोणकोणते लाभ होतात, ते सांगण्याच्या हेतूने आचार्यश्री त्याच विशेषणांचा रूपात आईचे वर्णन करीत आहेत.

योगानन्दकरी- आई जगदंबा साधकांना योगाचा आनंद प्रदान करते. कर्म, भक्ती, ज्ञान हे विविध योग शेवटी शरीरात राहूनच करावे लागतात. ते शरीर अन्नपूर्णेच्या कृपेने चालते. पर्यायाने या सर्व योगांचा आनंद तीच प्रदान करते. रिपुक्षयकरी- रिपू अर्थात शत्रूंचा नाश करणारी. शास्त्रात आळसालाच शरीरातील सगळ्यात मोठा शत्रू म्हटले आहे. अन्न भक्षणातून उत्साह येतो. आळस निघून जातो. पर्यायाने या महाशत्रूचा ती विनाश करते. धर्मैकनिष्ठाकरी- धर्मावर साधकाची अविचल एक निष्ठा निर्माण करणारी.

चन्द्रार्कानलभासमानलहरी- चंद्र, अर्क म्हणजे सूर्य, अनल म्हणजे अग्नी, त्यांची भा म्हणजे तेज. त्याच्या समान जिच्या तेजो मंडळातील लहरी आहेत अशी.

त्रैलोक्यरक्षाकरी- स्वर्ग मृत्यु आणि पाताळ या तीनही लोकांचे रक्षण करणारी.

सर्वैश्वर्यकरी- साधकांना सर्व प्रकारचे ऐश्वर्य प्रदान करणारी.

तप:फलकरी - त्यांच्या तपाचे फळ प्रदान करणारी. काशीपुराधीश्वरी- काशीनगरीची सम्राज्ञी.

भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी- हे सकल कृपेचा आधार असणाऱ्या माते अन्नपूर्ण! मला ज्ञान भक्ती वैराग्य रूपी भिक्षा प्रदान कर.

श्रीशांकर स्तोत्ररसावली

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

५९) श्री अन्नपूर्णाष्टकम् ४

कैलासाचलकन्दरालयकरी गौरी उमा शङ्करी
कौमारी निगमार्थगोचरकरी ओङ्कारबीजाक्षरी ।
मोक्षद्वारकपाटपाटनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ।।४।।

कैलासाचलकन्दरालयकरी- अचल म्हणजे पर्वत. तो कधीही चल म्हणजे हालचाल करत नाही. कैलासाचल म्हणजे कैलास नावाचा पर्वत. कंदर म्हणजे गुहा. आलय म्हणजे निवास. अर्थात कैलास पर्वतावरील गुहांमध्ये जी निवास करते तिला कैलासाचलकन्दरालयकरी असे म्हणतात.

गौरी- रंगाने गोरी असणारी.

उमा- कालिका पुराणांत उमा शब्दाचा एक सुंदर अर्थ दिला आहे. देवी पार्वती भगवान शंकराचे घोर तप करत असताना हिमालयाची पत्नी मैनावती आपल्या मुलीच्या त्रासाला पाहून तिला उ म्हणजे हे आणि मा म्हणजे नको. अर्थात एवढे कष्ट घेऊ नको असे म्हणाली. त्यावरून देवी पार्वतीचे नाव उमा असे पडले. वेगळ्या शब्दात ध्येय प्राप्त होईपर्यंत अविचल असणारी.

शङ्करी- शं म्हणजे कल्याण करणारी. शंकरांची सहधर्मचारिणी म्हणून तिला शांकरी असे पण म्हणतात.

कौमारी- कुमार अवस्थेत असलेली अर्थात अत्यंत पवित्र.

निगमार्थगोचरकरी- निगम म्हणजे वेद. त्यांचा अर्थ गोचर म्हणजे प्रकट करणारी. ओङ्कारबीजाक्षरी- ओंकार हेच जिचे बीजाक्षर आहे ती ओङ्कारबीजाक्षरी.

मोक्षद्वारकपाटपाटनकरी- मोक्षाच्या द्वाराचे कपाट अर्थात दाराचे पल्ले उघडून मोक्षाचा मार्ग मुक्त करणारी.

काशीपुराधीश्वरी- काशीनगरीची सम्राज्ञी.

भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी- सकल कृपेचे अधिष्ठान असणाऱ्या हे माते अन्नपूर्णे मला भक्ती ज्ञान वैराग्य स्वरूपाची भिक्षा प्रदान कर.

श्रीशांकर स्तोत्ररसावली

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

६०) श्री अन्नपूर्णाष्टकम् ५

दृश्यादृश्यविभूतिवाहनकरी ब्रह्माण्डभाण्डोदरी
लीलानाटकसूत्रभेदनकरी विज्ञानदीपाङ्कुरी ।
श्रीविश्वेशमनःप्रसादनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ।।५।।

आई जगदंबेचे वैभव वेगवेगळ्या अंगाने प्रस्तुत करताना आचार्यश्री म्हणतात,

दृश्यादृश्यविभूतिवाहनकरी- दृश्य अर्थात दिसू शकणारे आणि अदृश्य अर्थात न दिसणारे. आपल्या आकलनाच्या ही पलीकडे असणारे. विभूती अर्थात वैभव. संपत्ती. आपल्या भक्तांना जी दृश्य आणि अदृश्य स्वरूपातील अद्वितीय वैभव प्रदान करते त्या आदिशक्तीला दृश्यादृश्यविभूतिवाहनकरी असे म्हणत असतात.

ब्रह्माण्डभाण्डोदरी- या संपूर्ण ब्रह्मांडांचा पसारा जिच्या उदरात राहतो, अर्थात जिच्या उदरातून जन्माला येतो त्या विश्वजननीला ब्रह्माण्डभाण्डोदरी असे म्हणतात.

लीलानाटकसूत्रभेदनकरी- या संपूर्ण जगाच्या संचालनासाठी जसा एखादा कळसूत्री बाहुल्यांचा खेळ करणारा आपल्या हातातील दोऱ्यांचा वेगवेगळ्या उपयोग करतो. हालचाली करतो. भेद म्हणजे बदल करतो. त्यानुसार खालील बाहुल्यांना आपल्या तालावर नाचवतो. त्याप्रमाणे विश्वाचे संचालन करणारी.

विज्ञानदीपाङ्कुरी- विज्ञान अर्थात विशेष ज्ञान. ब्रह्मज्ञान. त्याचा दीपाचा अंकुर असणारी. अर्थात जिच्या आधारावरच ब्रह्मज्ञान उजळते अशी. समाधीदायक कुंडलिनी शक्ती स्वरूपिणी.

श्रीविश्वेशमनःप्रसादनकरी- भगवान श्री विश्वनाथांच्या मनाला अत्यंत आनंद प्रदान करणारी.

काशीपुराधीश्वरी- काशीनगरीची सम्राज्ञी.

भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी- सकल कृपेचा आधार असणाऱ्या हे माते अन्नपूर्णे मला भक्ती, ज्ञान,वैराग्यरूपी भिक्षा प्रदान कर.

श्रीशांकर स्तोत्ररसावली

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

६१) श्रीअन्नपूर्णाष्टकम् ६

उर्वीसर्वजनेश्वरी जयकरी माताकृपासागरी
वेणीनीलसमानकुन्तलधरी नित्यान्नदानेश्वरी ।
सर्वानन्दकरी सदा शुभकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ।।६।।

आई जगदंबेचा वैभवाचे आणखी काही पैलू कडून दाखवताना भगवान जगद्गुरु आदि शंकराचार्य स्वामी महाराज म्हणत आहेत,

उर्वीसर्वजनेश्वरी- उर्वी अर्थात पृथ्वी, त्यावरील सर्वजन अर्थात सर्वप्रकारचे लोक त्यांची ईश्वरी म्हणजे स्वामिनी. त्याचप्रमाणे सर्व म्हणजे सर्वप्रकारचे जीव. त्यांची जनेश्वरी म्हणजे उत्पन्न करणारी देवता. सोप्या शब्दात पृथ्वीवरील सर्व जीवांची तथा लोकांची माता ती उर्वीसर्वजनेश्वरी.

जयकरी- उपासकांना त्यांच्या सुयोग्य, इच्छित कार्यात विजय प्रदान करणारी.

माताकृपासागरी- जसा सागराचा अंतपार लागत नाही तसाच तिच्या कृपेचा पारावार सापडत नाही , अशा अपार करुणामयी आई जगदंबेला माताकृपासागरी म्हणतात.

वेणीनीलसमानकुन्तलधरी- खूप काळ्या केसांना तेल लावले तर ते निळसर दिसतात. अशा निळसर, कुंतल म्हणजे केसांची समान अर्थात व्यवस्थित रचना करून तिने धारण केली आहे. त्यामुळे तिला वेणीनीलसमानकुन्तलधरी संबोधिले आहे.

नित्यान्नदानेश्वरी- मा अन्नपूर्णा समस्त जीवांना नित्य अन्नाचे दान करीत असते.

सर्वानन्दकरी - पोट भरल्यानंतर प्राप्त होणारा आनंद सर्वांना प्रदान करणारी. सर्व प्रकारचे आनंद प्राप्त करून देणारी.

सदा शुभकरी- साधकांचे, उपासकांचे सदैव कल्याण करणारी. मंगल करणारी.

काशीपुराधीश्वरी- काशीनगरीची सम्राज्ञी.

भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी- सकल कृपेचे अधिष्ठान असणाऱ्या हे माते अन्नपूर्णे मला भक्ती,ज्ञान आणि वैराग्याची भिक्षा प्रदान कर.

श्रीशांकर स्तोत्ररसावली

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

६२) श्री अन्नपूर्णाष्टकम् ७

आदिक्षान्तसमस्तवर्णनकरी शम्भोस्त्रिभावाकरी
काश्मीरत्रिपुरेश्वरी त्रिलहरी नित्याङ्कुरा शर्वरी ।
कामाकाङ्क्षकरी जनोदयकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ।।७।।

आदिक्षान्त - हा येथील पहिला शब्दच मोठा रमणीय आहे. आदि शब्दातही अ+ आदि असा विग्रह आहे. त्याचा अर्थ पासून सुरु होणारे. क्षान्त अर्थात क्ष पर्यन्तचे. अ पासुन क्ष पर्यंतच्या सर्व वर्णांपासून निर्माण होणारे सर्व शब्द जिचेच वर्णन करतात तीआदिक्षान्तसमस्तवर्णनकरी.

या मध्ये ज्ञ चा उल्लेख नाही. ज्ञ ज्ञानाचा वाचत आहे आणि ते ज्ञान तिचे स्वरूप आहे. अ पासून क्ष पर्यंतच्या सर्व वर्णांच्या द्वारे त्या ज्ञ अर्थात जगदंबेचेच वर्णन केले जाते ती आदिक्षान्तसमस्तवर्णनकरी.

शम्भोस्त्रिभावाकरी- भगवान शंकरांना तीन भावांमध्ये प्रगट करणारी. येथे भगवान शंकर हा शब्द परब्रह्म या अर्थाने आला आहे. त्या निर्गुण निराकार परब्रह्माला सत्व,रज,तमात्मक तीन गुणांनी युक्त, सगुण साकार करणारी.

काश्मीरत्रिपुरेश्वरी- काश्मीर प्रांतात निवास करणारी त्रिपुरसुंदरी.

त्रिलहरी- तीन गुणांच्या रूपात हालचाल करणारी.

नित्याङ्कुरा- अंकुर हे नूतनतेचे, विकासनशीलतेचे प्रतीक. तशी नित्यनूतन असणारी. शर्वरी - शर्व म्हणजे भगवान शंकर. त्यांच्या विनाशकारी शक्ती मुळे त्यांना हे नाव आहे. त्यांची शक्ती म्हणून शर्वरी.

कामाकाङ्क्षकरी- भक्तांच्या कामना, आकांक्षा पूर्ण करणारी.

जनोदयकरी- साधकांच्या भाग्याचा उदय करणारी.

काशीपुराधीश्वरी- काशीनगरीची सम्राज्ञी.

भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी- सकल कृपांचा आधार असणाऱ्या हे आई अन्नपूर्ण! मला भक्ती ज्ञान वैराग्यरूपी भिक्षा प्रदान कर.

श्रीशांकर स्तोत्ररसावली

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

६३) श्री अन्नपूर्णाष्टकम् -८

देवी सर्वविचित्ररत्नरचिता दाक्षायणी सुन्दरी
वामा स्वादुपयोधरा प्रियकरी सौभाग्यमाहेश्वरी ।
भक्ताभीष्टकरी सदा शुभकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ।।८।।

देवी- देव शब्दांमध्ये संस्कृतचा द्यू धातू आहे. त्याचा अर्थ चमकणे, दिव्यत्वाने उजळणे, इतरांना चमकवणे. असे करतात ते देव. त्याचा स्त्रीलिंगी शब्द देवी. अर्थात अत्यंत उज्ज्वल असणारी. सकल विश्वाला तेजस्वी करणारी.

सर्वविचित्ररत्नरचिता- अनेक सौंदर्यपूर्ण रत्नांनी युक्त असे अलंकार धारण करणारी.

दाक्षायणी- देवी पार्वती पूर्वजन्मात सती होती. तिचा तो अवतार दक्ष प्रजापतीच्या घरी झाला होता. त्या स्वरूपात दक्षांची कन्या म्हणून दाक्षायणी.तिने स्वतःला दक्ष यज्ञात जाळून घेतल्यानंतर पुढे ती पार्वती रुपात जन्माला आली.

सुन्दरी- लोकोत्तर सौंदर्याने युक्त असणारी.

वामा- वामा शब्दाचा अर्थ देखील सौंदर्यवती असाच आहे. वाम म्हणजे डावा. जी आपल्या सौंदर्याने सगळ्यां सौंदर्यवतींना डावीकडे सरकवते अर्थात् गौण ठरवते अशी.

स्वादुपयोधरा - स्वादु अर्थात अत्यंत गोड. पय म्हणजे दूध. आपल्या मातृत्व रूपात अत्यंत मधुर दुग्ध धारण करणारी.

प्रियकरी- भक्तांचे, साधकांचे सर्वांगाने प्रिय करणारी.

सौभाग्यमाहेश्वरी - सकल प्रकारच्या सौभाग्याची सर्वश्रेष्ठ स्वामिनी असणारी.

भक्ताभीष्टकरी- भक्तांना अपेक्षित वर प्रदान करणारी.

सदा शुभकरी- साधकांचे,उपासकांचे सदैव कल्याण करणारी. मंगलदायीनी.

काशीपुराधीश्वरी- काशीनगरीची सम्राज्ञी.

भिक्षां देहि कृपावलंबनकरी मातान्नपूर्णेश्वरी- सकल कृपेचा आधार असणाऱ्या हे माते अन्नपूर्णे मला भक्ती, ज्ञान आणि वैराग्य स्वरूप भिक्षा प्रदान कर.

श्रीशांकर स्तोत्ररसावली

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

६४) श्री अन्नपूर्णाष्टकम्- ९

चन्द्रार्कानलकोटिकोटिसदृशा चन्द्रांशुबिम्बाधरी
चन्द्रार्काग्निसमानकुण्डलधरी चन्द्रार्कवर्णेश्वरी ।
मालापुस्तकपाशसाङ्कुशधरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी माताऽन्नपूर्णेश्वरी ।। ९।।

चन्द्रार्कानलकोटिकोटिसदृशा- चंद्र, अर्क म्हणजे सूर्य आणि अनल म्हणजे अग्नी. सामान्य जगातील या तीन तेजस्वी गोष्टी. त्यामुळे स्वाभाविकच कोणत्याही तेजस्वी गोष्टीला उपमा द्यायची तर यांचीच द्यावी लागते.

पण त्यातही मर्यादा आहे. चंद्राला कलंक आणि क्षय आहे तर सूर्य आणि अग्नीला दाहकता.

त्यासाठी आचार्य तिन्हीचा एकत्र विचार करतात. सूर्याचे तेज आणि चंद्राची शीतलता एकत्र. पण तरी ते कमी पडते. त्यामुळे 'कोटी कोटी' अर्थात या तिघांच्या एकत्रित तेजाचा अगणित पट आई तेजस्वी आहे. हे तिघेही कोटी-कोटी रूपात एकत्र आले तर जे तेज प्रकट होईल त्याप्रमाणे असणारी.

चन्द्रांशुबिम्बाधरी- चंद्राप्रमाणे जिचे मुख अत्यंत सुंदर आहे अशी. दुसरा अर्थ म्हणजे जिने चंद्राची कोर आपल्या मस्तकावर धारण केली आहे अशी.

चन्द्रार्काग्निसमानकुण्डलधरी- चंद्र सूर्य आणि अग्नीच्या तेजाप्रमाणे तेजस्वी असणारी कुंडले कानात धारण करणारी.

चन्द्रार्कवर्णेश्वरी - जिचा वर्ण अर्थात त्वचेचा रंग चंद्र सूर्याप्रमाणे उज्ज्वल आहे अशी.

मालापुस्तकपाशसाङ्कुशधरी- जिने आपल्या चार हातात माला, पुस्तक, पाश म्हणजे दोरी आणि अंकुश धारण केले आहेत अशी.

काशीपुराधीश्वरी- काशीनगरी ची सम्राज्ञी.

भिक्षां देहि कृपावलम्बनकरी माताऽन्नपूर्णेश्वरी- सकल कृपेचा आधार असणाऱ्या हे माते अन्नपूर्णे मला भक्ती ज्ञान आणि वैराग्याची भिक्षा प्रदान कर.

श्रीशांकर स्तोत्ररसावली

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

६५) श्री अन्नपूर्णाष्टकम् -१०

क्षत्रत्राणकरी महाऽभयकरी माता कृपासागरी
साक्षान्मोक्षकरी सदा शिवकरी विश्वेश्वरी श्रीधरी ।
दक्षाक्रन्दकरी निरामयकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी माताऽन्नपूर्णेश्वरी ।। १०।।

क्षत्रत्राणकरी- क्षत्र शब्दाचा एक अर्थ आहे संकट. त्यापासून त्राण म्हणजे संरक्षण करणारी.

महाऽभयकरी- अभय अर्थात सर्व प्रकारच्या भीतीं पासून मुक्ती देणारी.

सामान्य जीवनात सगळ्यात मोठी भीती असते मृत्यूची. त्यालाच आपण त्राण म्हणजे संकट समजतो. आई जगदंबेच्या कृपेने ही मृत्यूची भीती नष्ट होते. एकदा ही भीती नष्ट झाली की माणूस खऱ्या अर्थाने अभय होतो.

माता- जसा एखादा बालक स्वतःला आपल्या आईच्या जवळ अत्यंत सुरक्षित समजतो. तसेच सर्व विश्व जिच्या चरणाजवळ सुरक्षित असते ती विश्वमाता.

कृपासागरी- अपार कृपेचा सागर असणारी.

साक्षान्मोक्षकरी- प्रत्यक्ष मोक्ष प्रदान करणारी. हा शब्द समजून घ्यायला हवा. मोक्ष ही देहपतनानंतर ची अवस्था. ती प्रत्यक्ष कशी असेल? देहातीत झाल्यावरचा जो आनंद तो मोक्ष. मात्र तोच आनंद ज्यावेळी या देहात प्राप्त होतो त्यावेळी तिला मुक्ती, जीवनमुक्ती असे म्हणतात. हा प्रत्यक्ष मोक्ष प्रदान करते तिला साक्षान्मोक्षकरी असे म्हणतात.

सदा शिवकरी - सदैव कल्याण करणारी. विश्वेश्वरी- संपूर्ण विश्वाची स्वामिनी. श्रीधरी- श्री म्हणजे वैभव. सकल वैभवाला धारण करणारी.

दक्षाक्रन्दकरी- दक्षाला कन्या वियोग दुःखात आक्रंदन करायला लावणारी. निरामयकरी- आमय म्हणजे रोग. सर्व प्रकारच्या शारीरिक आणि मानसिक रोगांपासून मुक्ती देणारी.

काशीपुराधीश्वरी- काशीनगरीची सम्राज्ञी.

भिक्षां देहि कृपावलंबनकरी माताऽन्नपूर्णेश्वरी-सकल कृपेचा आधार असणाऱ्या हे माते अन्नपूर्णे मला भक्ती, ज्ञान आणि वैराग्याची भिक्षा प्रदान कर.

श्रीशांकर स्तोत्ररसावली

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

६६) श्रीअन्नपूर्णाष्टकम्- ११

अन्नपूर्णे सदापूर्णे शङ्करप्राणवल्लभे ।
ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थं भिक्षां देहि च पार्वति ।। ११।।

आई जगदंबा पार्वतीला अन्नपूर्णेच्या स्वरूपात भिक्षा मागताना भगवान जगद्गुरु शंकराचार्य स्वामी महाराज येथे काही वेगळ्याच भूमिका आपल्यासमोर ठेवत आहेत.

अन्नपूर्णे सदापूर्णे- या पहिल्याच उल्लेखात हे वेगळेपण लक्षात घेता येते. हे दोनही शब्द वेगवेगळे करून पाहिले तर तो भाव लक्षात येत नाही. अन्न देणारी, सदैव पूर्णता देणारी असे दोन सामान्य अर्थ होतील.

पण एकत्रित पाहिले तरच वेगळा अर्थ कळू शकतो.

अन्न हा मानवी जीवनाचा आधार. त्यालाही ब्रह्म म्हटले. पण ते सामान्य अन्ना बाबत का? ते अन्न तर चार-पाच दिवसावर टिकत नाही. सदैव टिकणारे ते खरे अन्न. ते तोंडाने घेता येत नाही. ते श्री गुरुमुखातून कर्णात पाझरते. त्या शास्त्रज्ञानाला, ब्रह्मज्ञानाला शाश्वत अन्न म्हणतात. ते प्रदान करणारी जी तिला साद आहे, अन्नपूर्णे सदापूर्णे.

शङ्करप्राणवल्लभे- ती भगवान शंकरांची प्रिया आहे. ते शंकर आहेत तर ही शांकरी. कल्याणकारिणी.

ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थं- ना देवी अन्नपूर्णा सामान्य आहे ना तिला मागितलेले अन्न. मागणी ज्ञानवैराग्याच्या सिद्धीसाठी आहे. त्याच भिक्षेची मागणी आहे. कोणाला? तर पार्वतीला. आत्तापर्यंत अन्नपूर्णा म्हणत होते. आताच पार्वती का? तर त्या शब्दातच खेळ आहे.

कधी काळी ती सती होती ती शंकरांना सोडून दक्ष यज्ञात गेली. शेवटी जळाली. नष्ट झाली. का? तर शंकरांना सोडून गेली. त्यांच्या चरणाशी स्थिर राहिली नाही. मग नष्ट झाली.

दुसऱ्या जन्मात पार्वती झाली. पर्वत कन्या. अचला, अविचला झाली.

माझी वृत्ती ईशचरणी अशीच अविचल राहो हीच भिक्षा मागायची आहे. त्या सदैव आनंददायी, ज्ञानवैराग्य सिद्धिदायिनी भिक्षेसाठी पार्वतीला मागणे...

भिक्षां देहि च पार्वति !

श्रीशांकर स्तोत्ररसावली

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

६७) श्री अन्नपूर्णाष्टकम् १२

माता च पार्वती देवी पिता देवो महेश्वरः ।
बान्धवाः शिवभक्ताश्च स्वदेशो भुवनत्रयम् ।। १२।।

परमपूज्य आचार्यश्रींचे मागणे सामान्य नाही. त्यांची भूक केवळ पोटाची नाही. त्यांना अपेक्षित असलेले अन्न केवळ पोट भरणारे अन्न नाही. हे सिद्ध करणारा हा या स्तोत्रातील अंतिम श्लोक.

आचार्यश्री आपल्या अतिदिव्य संसाराबद्दल येथे विवेचन करीत आहेत. ते म्हणतात,

माता च पार्वती देवी- देवी पार्वती हीच माता आहे. पार्वती म्हणजे अत्यंत स्थिर असणारी, अविचल श्रद्धा.

शिवपार्वती चे स्वरूप 'श्रद्धा विश्वासरूपिणौ' असेच वर्णन केले आहे. ती दृढ श्रद्धा आहे देवी पार्वती.

अशा दृढ श्रद्धेने युक्त असणारी बुद्धी म्हणजेच पार्वती.

ह्या बुद्धीने मिळणाऱ्या तृप्ततेचा विचार खरा महत्वाचा आहे. ही तृप्तताच शाश्वत आहे. पोटाची तृप्तता काही तासात संपणार आहे. बौद्धिक तृप्तता मात्र शाश्वत आहे. ती तृप्ती येते शास्त्राच्या ज्ञानाने. ते देते ती खरी अन्नपूर्णा.

ती बुद्धी ज्या जीवात्म्याची क्रीडासंगिणी तोच माझा पिता. त्यासाठीच उल्लेख केला, पिता देवो महेश्वरः !

या माया- मायेश्वराच्या साहचर्याचा परिणाम आहे हे सर्व विश्व. हे दोघेच सकल जीवांचे जन्मदाते. पर्यायाने सकल जीव माझे बांधव.

बान्धवाः शिवभक्ताश्च- हा उल्लेख याच साठी. पण त्यातही नाते कोणत्या जीवांसोबत तर शिवभक्ताश्च. बाकीच्यां सोबत वेळेचा अपव्यय नको. भगवद्भक्त तेवढेच माझे. माझ्या भक्तीला, ज्ञानाला, वैराग्याला पोषक असतील तेच बांधव. बाकी निरर्थक. त्यांना सोडता यायला हवे.

फक्त भगवद्भक्तांनाच धरायचे.

मग माझ्या विस्ताराला, आनंदाला पारावार नाही. कारण,

स्वदेशो भुवनत्रयम् !

हे संपूर्ण विश्वच माझे म्हटल्यावर दुःख कुठले?

हीच भिक्षा हवी.

या परम आनंदची मागणी आहे अन्नपूर्णाष्टकम.

ती मागणी पुरवते माता अन्नपूर्णा.

जय अन्नपूर्णे !